ISSN : 2319-6467

# नवाक्षर ॥ दर्शन ॥

ऑक्टो.-नोव्हें.-डिसें. २०१६



तुका म्हणे आम्ही विधीचे जनिते । स्वयंभू, आईतें केले नव्हें।।

नवाक्षर

# ॥ दर्शन ॥


ISSN : 2319-6467

वर्ष दहा। अंक एक (ऑक्टो.-नोव्हें.-डिसें. २०१६)

मूल्य शंभर रुपये

संस्थापक संपादक : प्रवीण बांदेकर

**संपादक : गोविंद काजरेकर**



**संपादक मंडळ**

वीरधवल परब, शरयू आसोलकर,
डॉ. अनिल धाकू कांबळी, अजय कांडर

**व्यवस्थापन**

रवींद्र संकपाळ, मधुकर मातोंडकर

**मुखपृष्ठ व मलपृष्ठ**

नीलेश जाधव

**रेखाचित्रे**

राजू बावीस्कर



**मांडणी/मुद्रण**

भारती मुद्रणालय, कोल्हापूर
८३२ ई, शाहुपुरी ४ थी गल्ली,
कोल्हापूर -४१६ ००१
फोन : (०२३१) २६५४३२९


## अनुक्रम


संपादकीय / ३

क्रोपर्डीच्या निमित्ताने / प्रा. डॉ. गणेश मोहिते / ५

'मूल्य'वान व सत्याग्रही महाश्वेतादेवी / सोनाली नवांगुळ / ९

'मराठी'चे समकालीन वास्तव / डॉ. नंदकुमार मोरे / १२

'अभिधा'-'अभिधानंतर'मधील काव्यसमीक्षा / डॉ. आशुतोष पाटील / २०

**कविता**

मोहन कुंभार / २८-२९

हर्षवर्धिनी जाधव / २९-३०

प्रणव सखदेव / ३१



**पत्रव्यवहार**

व्यवस्थापक, नवाक्षर दर्शन, बी-४, विठ्ठल कृपा अपार्टमेंट, सबनीसवाडा, सावंतवाडी
जि. सिंधुदुर्ग ४१६ ५१० (भ्रमणध्वनी : ९४२२६३३३५५)

वार्षिक/त्रैवार्षिक वर्गणीऐवजी कायमस्वरुपी देणगी मूल्य २०००/- रुपये पाठवावे.
या रकमेचा डीडी/चेक 'संपादक दर्शन' या नावाने काढावा.

हा अंक प्रकाशक श्री. हरिहर वाटवे यांनी भारती मुद्रणालय, कोल्हापूर येथे छापून सबनीसवाडा, सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग येथे खाजगी वितरणार्थ प्रकाशित केला. यात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

# कोपर्डीच्या निमित्ताने

प्रा. डॉ. गणेश मोहिते

१३ जुलैच्या सायंकाळी महाराष्ट्राच्या पुरोगामित्वाला लांच्छन लावणारी अमानुष घटना नगर जिल्ह्यातील 'कोपर्डी' या दीडेक हजार लोकसंख्या असणाऱ्या छोट्याशा गावात घडली. एका नववीत शिकणाऱ्या शाळकरी मुलीवर बलात्कार करून तिचा निर्घृणपणे खून करण्यात आला. तिच्या देहाची विटंबना करण्यात आली. कुठलाही दोष नसताना एक पापभीरू, निष्पाप मुलगी नशेत असणाऱ्या नराधमांच्या वासनेला बळी पडली आणि या अमानुष घटनेने पुन्हा देश हादरला. दिल्लीतील 'निर्भया' प्रकरण १६ डिसेंबर, २०१२ रोजी घडले होते. त्यानंतर देशात मोठा आक्रोश निर्माण झाला होता. या प्रकरणातील अमानुषतेची, कौर्याची हीणकस पातळी पाहून समाजमन भेदरले, अस्वस्थ झाले, लोक रस्त्यावर आले, शासन, प्रशासन जागे झाले आणि निर्भयाच्या नावे एक नवा कायदा या देशात तयार झाला.

'बलात्कार' या शब्दाची व्याख्या बदलण्यात आली, शब्दाची व्याप्ती वाढविण्यात आली. मात्र, त्यानंतरही देशातील स्त्रियांवरील बलात्कार, अत्याचार थांबलेत का? तर त्याचे उत्तर नाही, असेच द्यावे लागते. आजही देशात दर बावीस मिनिटांनी एक बलात्कार होत असल्याचे सर्वेक्षण सांगते. देशात या घटना थांबल्या की वाढल्या, याचे स्वतंत्र सर्वेक्षण या कायद्याच्या अंमलबजावणीनंतर करता येईल हवे तर; मात्र अमानुषता, क्रौर्य आणि माणसातील पशुत्व कमी झाले, असे 'कोपर्डी' प्रकरणानंतर तरी निश्चित म्हणता येणार नाही. यांसारख्या घटना घडतात, त्यातही पुरोगामित्वाचा टेंभा मिरविणाऱ्या प्रगत, सुधारणावादी विचारांच्या महाराष्ट्रात घडतात, तेव्हा संपूर्ण देशातील समाजमन अस्वस्थ होते. गेल्या काही वर्षांत 'खैरलांजी', 'सोनई', 'खर्डा', 'जवखेडे', आता 'कोपर्डी' या ठिकाणी घडलेल्या घटनांनी आमचा 'मुखवटा' उघड केला आहे. या प्रत्येक घटनांचे संदर्भ, तपशील वेगवेगळे आहेत; मात्र या चार-पाच घटनांतील क्रौर्य, अमानुषता यात साधर्म्य आहे आणि या घटनांच्या केंद्रस्थानी 'स्त्री' आहे. अशा घटना महाराष्ट्रात वारंवार घडत आहेत, हे विलक्षण अस्वस्थ करणारे आहे.

या घटनांनी 'स्त्री'चे समाजातील स्थान, स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन, यांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. आम्ही मोठ्या अभिमानाने फुले, शाहू, आंबेडकरांचा वारसा सांगतो, छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक आदर्श दृष्टिकोन मिरवतो, राज्यघटनेतील 'स्त्री-पुरुष समानतेच्या' मूल्याची शपथ घेतो, सर्व भारतीय माझे बांधव वगैरे प्रतिज्ञा म्हणतो; मात्र प्रत्यक्ष 'स्त्री'विषयक आपले वर्तन, व्यवहार आणि दृष्टिकोन तपासला, तर समाजातील विसंगती, हाच आज चिंतेचा विषय झाला आहे. पुरुषी सरंजामीवृत्ती आजही संपुष्टात आलेली नाही. मनूप्रणीत व्यवस्थेने स्त्रीला शूद्रातीशूद्र ठरवले. स्त्रीवर समाजव्यवहारात प्रचंड बंधने घातली गेली. 'स्त्री' हे आपल्या इभ्रतीचे प्रतीक मानले गेले. पर्यायाने ती पुरुषाची गुलाम झाली. पुरुषी वर्चस्व सिद्ध करण्याचे हक्काचे ठिकाण बनले. स्त्रीला समाज, संस्कृती घडविण्याच्या वहनाच्या प्रक्रियेशी जोडले गेले. तिचे चारित्र्य, शुचिता, मर्यादा, या गोष्टींना सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले. त्यातून स्त्रीकडे पाहण्याचा आमचा 'सनातनी' दृष्टिकोन आकाराला आला. स्त्रीला उपभोग्य वस्तू मानण्यात आले. 'स्त्री'ने काय खावे? काय प्यावे? पोशाख कसा करावा? इथंपासून ते आजपर्यंत कोणत्या मंदिरात माथा टेकावा? इथंपर्यंतचा तिचा सामाजिक व्यवहार पुरुषी मानसिकतेतून नियंत्रित करण्यात आला. पुरुषांचा अहंगंड दुखावला जातो, तेव्हा पुरुषाला वर्चस्व सिद्ध करावयाचे असते किंवा पुरुषाच्या मनात बदल्याची भावना खदखदत असते, तेव्हा त्याच्या अत्याचाराचा पहिला 'बळी' ही स्त्रीच असते. अगदी राजेशाही

यासाठी आमचे मापदंड ठरलेले आहेत आणि हे फार भंपक आहे. अर्थात, 'स्त्री' कोणत्याही समाजाची असो, तिच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराची दखल शासन, प्रशासन, माध्यमांनी तत्काळ घ्यायलाच हवी. तिला न्याय मिळवून देण्यासाठी या घटकांनी तत्पर असायलाच हवे. मात्र, आम्ही कोणत्या जातीपुरते बोलायचे, कोणत्या जातीपुरते लिहायचे, कोणत्या घटनेचे उदात्तीकरण करायचे, कोणती घटना दाबून टाकायाची, कोणत्या घटनेचा समाजाने निषेध नोंदवयाचा वगैरे बाबींचे ठोकताळे ठरले गेले आहेत. ज्या समाजाच्या जातीच्या संघटना प्रबळ आहेत. त्या बंद, निषेध, मोर्चे वगैरे काढतात. भले तो जातीय रंग असेलही; परंतु किमान पक्षी त्या अत्याचारित स्त्रीच्या न्यायासाठी सरकारी यंत्रणांवर एक प्रकारे दबाव तरी आणतात. त्यांची दखल घेतली जाते, चर्चा होते. परंतु, ज्या समूहाच्या संघटना नाहीत, ज्यांचा आवाज संघटित नाही, अशा समाजातील स्त्रियांच्या बाबतीत अमानुष घटना घडली, तर त्याची हे शासन, प्रशासन, मीडिया कशी दाखल घेणार, त्यांना न्याय कसा मिळणार वगैरे प्रश्न डोक्याला कुरतडणारे आहेत. ज्या समूहाचे सत्तेत, प्रशासनात, माध्यमांमध्ये कोणी प्रतिनिधी नाहीत, ज्यांची संघटना नाही, अशा शेकडो जातिजमातीतील स्त्रियांवरील अन्याय, अत्याचारांच्या न्यायाचे काय होत असेल, हा उपरोक्त मुद्दा वस्तुस्थितीचा आणि वास्तवाचा निर्देश करण्यासाठी अधोरेखित केला आहे. कोणताही आरोपी, गुन्हेगार जो या पद्धतीने क्रूरकर्म करतो, तेव्हा त्याची 'जात' महत्त्वाची नसते किंवा त्याला 'जात' कारणीभूत नसते. ही प्रवृत्ती आहे आणि ती सर्वत्र सापडते. त्यामुळे या घटनांकडे जातीय अंगाने पाहणे, त्याचे राजकारण करणे, यावर सामाजिक कलहाच्या, द्वेषाच्या पेरण्या करून आपल्या मतांची गणिते मांडणे वगैरे खेळ आपल्या देशात अनेकांकडून सर्रास खेळले जातात आणि जनमानसाची दृष्टी या अनुषंगाने कलुषित केली जाते आणि यामुळे अशा घटना घडल्यानंतर मूळ मुद्द्यांकडे दुर्लक्ष होते अथवा त्यांवर चर्चाच होत नाही.

खरेतर या घटनेमागील मुळे आपण शोधली पाहिजेत. ही विकृती आमच्या समाजात का निर्माण होत आहे, माणूस इतक्या क्रूरपणे का वागू पाहात आहे, पशूच्या लैंगिक वर्तनालाही लाजवेल, त्याच्याही पलीकडे ही हिंसक, लैंगिक प्रवृत्ती समाजात का निर्माण होत आहे? यातील एका आरोपीची तीन लग्ने झाली आहेत. तिन्ही बायकांसोबतचे वर्तन, त्याची मानसिकता आणि पुन्हा त्याच्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या पशुत्वपातळीवरील लैंगिक भावना, या बाबींचा मानसशास्त्रीयदृष्ट्या शोध घेतला पाहिजे. आज समाजात वाढत जाणारी व्यसनाधीनता, बेरोजगारी, चित्रपट, मालिका, जाहिराती यांत स्त्रीदेहाचा मार्केटिंगसाठी केला जाणारा भडक वापर व त्यातून स्त्रीदेहाविषयी निर्माण होणारे आकर्षण, या बाबी चिंतनीय आहेत. आपली शिक्षणव्यवस्था, अभ्यासक्रम त्यातून दिली जाणारी मूल्ये, कुटुंब, समाज, धर्म इत्यादी व्यवस्था, त्यातून होणारे 'स्त्री'विषयक संस्कार या सर्वांचे मानसशास्त्रीय परिणाम वगैरे आम्ही कधी तपासणार आहोत की नाही? भले त्या आरोपीला मृत्युदंड अथवा लिंग-विच्छेदनासारखी शिक्षा वगैरे काय द्यायची ते न्यायव्यवस्था देईल; परंतु पुन्हा समाजात 'कोपर्डी' घडू नये म्हणून आरोपींच्या मानसिक वर्तनाचा, त्यामागील कारणांची, ही क्रूर पाशवी वर्तन करण्यासाठी ते का उद्युक्त झाले, याची मानसशास्त्रीय चर्चा कधी आमचा समाज, न्यायालये, मीडिया व शासन खुलेपणाने करेल काय? लैंगिक शिक्षणाचा अभ्यासक्रमात समावेश वगैरे म्हणणे ठीक आहे, नाहीतरी आज कोवळ्या वयात मोबाइल, इंटरनेट हाती आलेली पिढी या बाबींचे अनौपचारिक शिक्षण औत्सुक्याने घेत आहेच. जगात सर्वाधिक इंटरनेचा वापर पौगंडावस्थेतील मुले कशासाठी करतात, त्यावर काय पाहतात वगैरेंचे सर्वेक्षण जाहीर झाले आहे. त्याचा काय परिणाम तरुण पिढीवर होतो आहे, याचीही चर्चा झाली पाहिजे. या विकृती नेमक्या आमच्या समाजात उत्पन्न का होत आहेत, याचा अन्वयार्थ लावायला आज समाज म्हणून आपण कमी पडतो आहोत, हे मान्यच करावे लागते.

'कोपर्डी'सारखे प्रकरण पुन्हा घडू नये म्हणून आपल्याला कधीतरी त्यास मूलतः कारणीभूत असलेल्या बाबींचा, कारणमीमांसेची चर्चा करावी लागेल. समाजाच्या वातावरणाविषयी बोलावे लागेल. शाळा, महाविद्यालयांमध्ये व